**<u>ठळक बातम्या</u>**

- अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा राज्यपालांनी स्विकारला

- अबु आझमी यांच्या निलंबनाची मागणी करत सत्ताधारी सदस्यांचा विधीमंडळात गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- आत्मनिर्भर भारत संकल्पनेवर काम केल्यामुळे देशात विकास कामांना चालना मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रति्पादन

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी २६५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिला. नैतिकतेला धरुन आणि तब्येत ठीक नसल्यानं राजीनामा दिल्याचं धनंजय मुंडे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुंडे यांचा राजीनामा स्वीकारला असून पुढच्या कार्यवाहीसाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला आहे असं फडनवीस यांनी विधानभवन परिसरात बातमीदारांशी बोलताना सांगितलं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी तो स्वीकारला आहे. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातले आरोपी मुंडे

यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील आणि भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

धनंजय मुंडे यांनी या आधीच राजीनामा द्यायला हवा होता. त्यांनी शपथ घ्यायलाच नको होती अशी प्रतिक्रिया पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केली.

तर, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले…

**होल्ड - बाईट - उद्धव ठाकरे ( २२ सेकंद)**

**<><><><><>**

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी थेट प्रसारमाध्यमांना दिली. हा सभागृहाचा अपमान असल्याचं सांगत याप्रकरणी उद्या मुख्यमंत्र्यांवर हक्कभंग आणण्याचा इशारा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दिला आहे. हिवाळी अधिवेशनातही फडनवीस यांनी सभागृहाची दिशाभूल केली होती, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अतिशय क्रूरपणे करण्यात आली असून नैतिकता म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला म्हणजे झालं असं नाही, मुख्यमंत्र्यांनी त्यांना बडतर्फ का केलं नाही हा प्रश्न आहे, असं सपकाळ म्हणाले. सरकार मुंडेंना वाचवायचा प्रयत्न करत होतं असा आरोप सपकाळ यांनी केला.

**<><><><><>**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातल्या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी आज पुकारलेल्या बीड जिल्हा बंदला सर्वच तालुक्यांमधून प्रतिसाद मिळाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचं कामकाज सत्ताधारी पक्षांच्या आमदारांच्या गदारोळानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी यांच्या राजीनाम्याची मागणी करत सत्ताधारी आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. आझमी यांनी औरंगजेब याच्या समर्थनार्थ वक्तव्य केल्याचा आरोप त्यांनी केला. गदारोळ वाढल्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं. कामकाज सुरू झाल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अबु आझमी हे देशद्रोही असून त्यांना निलंबित करावं, अशी मागणी केली. आझमी यांनी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे, असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट... एकनाथ शिंदे (१८ सेकंद)**

अबू आझमी यांच्या वक्तव्यावर शिंदे यांनी विधानपरिषदेतही निवेदन केलं. यावर सरकारनं कारवाई करावी असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतरही सत्ताधारी आमदारांनी घोषणाबाजी सुरू ठेवल्यानं

सभापतींनी कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केलं. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करावी असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. सत्ताधारी सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच ठेवल्यानं सभापतींनी कामकाज उद्यापर्यंत तहकूब केलं.

<><><><><>

मुघल शासक औरंगजेबाचा बचाव करणारं वक्तव्य केल्याप्रकरणी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांच्याविरोधात एफआयआर दाखल झाला आहे. नागरिकांच्या भावना दुखावल्या प्रकरणी मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. विधानभवन परिसरात काल त्यांनी पत्रकारांशी बोलताना हे वक्तव्य केलं होतं. या वक्तव्यानंतर शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाण्याच्या वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ही तक्रारही मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात पाठवण्यात आली.

<><><><><>

आत्मनिर्भर भारत संकल्पनेवर काम केल्यामुळे देशात विकास कामांना चालना मिळाली. गेल्या दहा वर्षांत देशात सातत्यानं झालेल्या सुधारणा, आर्थिक शिस्त, कामांत आलेल्या पारदर्शकतेमुळे उद्योग क्षेत्राचा सर्वसमावेशक विकास झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. अर्थसंकल्पानंतर सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रावर आयोजित

वेबिनारमध्ये प्रधानमंत्री बोलत होते. देशाला आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकार काम करत असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं.

प्रथमच उद्योग सुरू करणाऱ्या महिला तसंच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमधल्या पाच लाख व्यावसायिकांना दोन कोटी रुपये कर्ज मिळेल अशी घोषणा त्यांनी केली. तसंच निर्मिती आणि निर्यात प्रोत्साहनासाठी दोन नवीन मोहिमा सुरू करणार असल्याचंही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी जाहीर केलं. उद्योजकांनी दर्शक न राहता त्यांनी जागतिक पातळीवर ज्या वस्तूंना अधिक मागणी आहे, त्याचं उत्पादन करत त्यांच्या निर्यातीवर लक्ष केंद्रीत करण्याचं आवाहन त्यांनी केलं. उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन योजनांमुळे १३ लाख कोटी रुपयांचं उत्पादन झालं असून १ लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

येत्या महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या सर्व पात्र लाभार्थ्यांना दोन महिन्याचे हप्ते दिले जातील, अशी घोषणा राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी केली आहे. फेब्रुवारी आणि मार्च या दोन्ही महिन्यांचा मिळून ३ हजार रुपयांचा हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात दिली आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विधानसभेतल्या विरोधी पक्ष नेते पदावर दावा सांगितला आहे. आमदार भास्कर जाधव यांची नेमणूक

करावी असं पत्र पक्षानं आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलं. अर्थसंकल्पापूर्वी भास्कर जाधव यांची विरोधी पक्षनेते पदी नेमणूक होईल, अशी आशा पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. विरोधी पक्षनेते पद महाविकास आघाडीतल्या इतर पक्षांसोबत अडीच-अडीच वर्षांसाठी वाटून देण्याचा कुठलाही प्रस्ताव नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

व्हेव्ज शिखर परिषदेत आयोजित  केलेल्या  कॉमिक्स क्रिएटर स्पर्धेत सर्जनशीलतेला मोठा वाव  आहे, असं या स्पर्धेत उपांत्य फेरीतले विजेते निवडण्यासाठी नियुक्त केलेल्या पाच सदस्यीय ज्युरींपैकी एक असलेल्या जजेल होमावजीर यांनी सांगितलं. भारतात कॉमिक्सची बाजारपेठ किंवा वितरण प्रणाली नाही, या स्पर्धेमुळे कलाकारांना आपली कला बाजारपेठेत नेण्याची संधी निर्माण होईल, असं होमावजीर म्हणाले. या स्पर्धेसाठी फँटसी, साय फाय, भावनिक असे विविध विषय प्राप्त झाले आहेत, असं त्यांनी सांगितलं. कलाकारांनी आपली आवड जपावी असं आवाहनही होमावजीर यांनी  केलं.

<><><><><>

वेव्ज २०२५ कार्यक्रमांतर्गत ट्रेलर मेकिंग स्पर्धेसाठी बेंगळुरू इथे मार्गदर्शपर कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाचं आयोजन सीबीएफसी आणि नेटफ्लिक्स यांनी संयुक्तपणे केलं होतं. या कार्यशाळेचा उद्देश तरुण निर्मात्यांना या क्षेत्राविषयी अधिक माहिती मिळावी हा होता. या

कार्यशाळेत ॲनिमेशन, फिल्म मेकिंग, गेमिंग आणि कॉमिक्स विषयातल्या साठहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरू असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी २६५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र सामन्यातले ३ चेंडू बाकी असताना त्यांचा डाव २६४ धावांवर संपला. कर्णधार स्टीव्हन स्मिथनं सर्वाधिक ७३, तर ॲलेक्स कॅरेनं ६१ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे मोहम्मद शमीनं ३, तर वरुण चक्रवर्ती आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ९ षटकात २ बाद ४३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान लोहगाव इथं ३९ अंश ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**